सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,भंडारा,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)**

दुरध्वनी क्र.01784-251222 E-Mail- ddmobnd@gmail.com

**वाचा :**१. आपत्ती व्यवस्थापनकायदा, २००५ चेकलम३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना२०२०/प्रा.क्र.५८/ आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा**
**क्र.कक्ष/जिकाभं/जि.आ.व्य.अ./087/२०२०**
**दिनांक :- 15/०३/२०२०**

**आदेश**

राज्य शासनाने करोना विषाणूचा ( कोव्हीड १९ ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आली असून स्वातंत्र्यरित्या निर्गमित करण्यात येत आहे. तसेच सदर्भ क्र. ०२ मधील परिच्छेद ०३ नुसार कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणने व प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने भंडारा जिल्ह्याचे कार्यक्षेत्रात करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्ह्यामध्ये सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील आंगणवाड्या साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली माधिक तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे. देण्यात येत आहे.

उपरोक्त आदेशाचे अवाज्ञा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने भारतीय दंडसंस्था १८६० (४५) याच्या कलम १८८ शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,भंडारा**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा**

**प्रती** -१. सर्व विभाग प्रमुख ------------------------------------------------------------ जिल्हा भंडारा

**प्रत**-१.मा. विभागीयआयुक्त, नागपुर विभाग नागपुर यांचेकडे माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे माहितीस्तव सविनय सादर.

Scanned by CamScanner